# रामराज्याच्या पुनर्स्थापनेसाठी...

परमपिता शिवपरमात्म्याने १९३७ साली पिताश्री ब्रह्माबाबांच्या शरीरात दिव्य प्रवेश करत त्यांच्या मुखकमलाद्वारे सत्यगीताज्ञान देऊन 'सहज राजयोगाचा' विधि सांगितला. परिणामी पिताश्रींच्या जीवनात महान क्रांती घडून आली त्यांना शिवपित्याने आरंभिलेल्या ईश्वरी कार्याची ओळख पटली त्या भाग्यशाली ब्रह्मावत्सांनाही अतींद्रिय सुखाची अनुभूती झाली. त्यामुळे त्यांच्याही जीवनात क्रांती घडून आली. अतींद्रिय सुखाची अनुभूती घेणारे ब्रह्मावत्स कलीयुग रूपी चिखलात कमलपुष्पाप्रमाणे अलिप्त राहून पवित्र राहत आहेत. सरोवरात नित्य नवी-नवी कमले उमलत असतात, त्याप्रमाणे ब्रह्मावत्सानांही राजयोगाचा अभ्यास करीत असताना नित्य नवीन सुखद अनुभूती होत असतात.

कल्पपूर्वी शिवपित्यानने शिकविलेला भारताचा प्राचीन 'सहज राजयोग' ते सांप्रतकाळी पुन्हा शिकवित आहेत. त्या राजयोगाच्या अभ्यासाने मनुष्यात्म्यातील सुप्त आध्यात्मिक शक्ती जागृत होतात तसेच रजो तमो संस्कारवश होवून केलेल्या विकर्मांचा विनाश होवून तो पुढे सर्वगुणसम्पन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम बनतो. अर्थात त्याला स्वर्गीय देवता पद प्राप्त होते. हे इक वैज्ञानिक सत्य आहे की, आत्मा चैतन्य असल्याने त्यातून सतत प्रवाहित होणाऱ्या सुक्ष्म स्पंदनाने प्रकृती प्रभावित होते. राजयोगाद्वारे पुरुष अर्थात आत्मा जेव्हा सतोप्रधान बनतो तेव्हा प्रकृतीही आपोआप सतोप्रधान बनते.

म. गांधींनी सत्य, अहिसा, ब्रह्मचर्य, अस्तेय व अपरिग्रह या पंचशील तत्वांची कास धरून भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून सोडविले खरे पण त्यांचे भारतात रामराज्य स्थापनेचे कार्य (स्वप्न) अजूनही साकारले नाही. आदर्शाचे मेरूमणी बनलेल्या स्वामी विवेकानंदांनी स्वतः ब्रह्मचर्यांचे पालन केले. राष्ट्रातील युवकांना उद्देशून ते म्हणाले होते की, काया-वाचा-मनाने ब्रह्मचर्यव्रताचे पालन करणारे फक्त शंभर युवक मला मिळाले, तरी मी या भारत भूमीवर स्वर्ग उतरविन अशा युवकांचा शोध घेत घेत त्यांनी हिमाचल प्रवास केला पण त्यांच्या आवाहनाला त्यांना पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही आणि भारतभूमीचे स्वर्गात परिवर्तन करण्याची त्यांची इच्छाही पूर्ण झाली नाही.

चंद्र पौर्णिमेकडून अमावस्येकडे प्रवास करीत असताना त्याच्या कला हळूहळू कमी होत जातात व अमावस्येला तो कलाहीन बनतो. परिणामी सर्वत्र अंधःकार पसरतो. त्याचप्रमाणे मनुष्यात्म्यादेखील सत्ययुगाकडून कलीयुगाकडे प्रवास करीत असताना त्याच्या कला कमी होत जातात. वर्तमान काळ हा कलीयुगाचा अंतिम असल्याने मनुष्यात्मा कलाहीन बनला आहे. अज्ञान अंधकाराचे जणू सर्वत्र साम्राज्य पसरले आहे. म्हणतात ‘अंधारात होते पाप व उजेडात होते पुण्य’ वर्तमान समयी पापाचा यज्ञ भरून आला असल्याचे दिसते आणि पुण्य हा शब्द बोलण्यापुरताच उरलेला आहे. व्यवहारात पुण्यकर्म कुठेही आढळून येत नाही. यालाच रावणराज्य म्हणतात. तरीदेखील वाल्याचा वाल्मिकी झाल्याचे तुरळक उदाहरणे भारतीय आध्यात्मिक इतिहासात आढळून येतात. म्हणूनच वर्तमान काळी विश्वाचे लक्ष्य भारताकडे लागलेले आहे. परिवर्तन संसाराचा नियम असला तरी, त्यासाठी पुरूषार्थ करावाच लागतो. काम-क्रोधादि विकारांनी हजारो वर्षांपासून मनुष्यात्म्यांना ग्रासले आहे. यातूनही एकही मनुष्यात्मा सुटलेला नाही. म्हणजे प्रत्येक मनुष्यात्मा हा मनोरूग्ण आहे असे म्हटले तरी ती अतिशयोक्ति ठरू नये. मनोविकार रूपी रोगावर मात करण्यासाठी ‘‘सहज राजयोग’’ हे एकमेव औषध शिवपित्याने सांगितले आहे. निष्ठापूर्वक सतत राजयोगाचा अभ्यास केला तर साधकाचे मन केवळ मनोविकारापासून मुक्त होते असे नाही तर त्याचे मन शक्तिशालीही बनते याची अनेक उदाहरणे आपल्याला पहावयास मिळतात.

नेपोलियन बोनापार्ट, सम्राट सिकंदर, सम्राट अशोक आदींनी युद्धात विजय मिळवून आपले साम्राज्य टिकविण्याचा प्रयत्न केला परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत. सम्राट सिकंदराला जीवनात सत्ता, संपत्ती, मान, प्रतिष्ठा सर्व काही प्राप्त झाले असतानाही त्याने आयुष्याच्या संध्याकाळी एका अधिकाऱ्याला बोलावून आपल अर्थी दफनभूमीकडे नेत असताना आपले हात बाहेर ठेवायला सांगितले होते कारण मनुष्य हा रिक्त हस्ते जन्माला येतो व रिक्त हस्तेच परत जातो हा ‘गीतासंदेश’ त्याच्या अंत्ययात्रेत आलेल्या लोकांना दिला गेला. सम्राट अशोकने कलिंगच्या युद्धात लाखो लोकांचा बळी घेवून विजय मिळविला परंतु युद्धाच्या मैदानात वाहत असलेला रक्ताचा पूर पाहून त्याला वैराग्य आले तो आपल्या आत्मकथनात म्हणतो ‘बाहुबलाच्या सामर्थ्यावर कोणीही राज्य करू शकत नाही खरा राजा बनण्यासाठी स्वतःच्या व लोकांच्या मनावर राज्य करता आले पाहिजे.’’

वास्तविक आत्मा हा राजा आहे व शरीराची इंद्रिये ही त्याची प्रजा आहे. भृकुटी हे आत्मारूपी राजाचे सिंहासन आहे. मनुष्याला आपण आत्मा आहोत याची विस्मृती झाल्यामुळे त्याला आपल्या स्वपित्याची (परमपिता परमात्म्याची), स्वधर्माची (शांती हा आत्म्यांचा स्वधर्म आहे), स्वदेशाची (आत्म्याचे असली निवासस्थान आहे परमधाम - ब्रह्मतत्व) व स्वकर्मांची (सत्कर्माची) विस्मृती झाली आहे व त्यामुळे आत्मारूपी राजा इंद्रियेरूपी प्रजेरील राज्य गमावून बसला आहे.

भारताने गमावलेले रामराज्य खरे स्वराज्य पुन्हा मिळविण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातील लाखो ब्रह्माकुमार कुमारी गेली अनेक वर्षे प्रयत्नशील आहे. या विश्व विद्यालयात प्रोजेक्टर शो, व्याख्याने, प्रवचनमाला, संमेलने, मेळावे इत्यादी माध्यमातून राजयोगाचे शिक्षण विनामूल्य दिले जाते. नराला नारायण समान व नारीला लक्ष्मीसमान बनविण्यासाठी 'सहज ज्ञान व सहज राजयोगाचे' शिक्षण देणारे विश्वातील हे एकमेव विद्यालय आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com